# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

### श्री. स्वप्निल शिवाजी कणसे

कृषि उद्योजक, बी. एस्सी. (कृषि), कृषि महाविद्यालय, कोल्हापूर, एम.बी.ए. (मार्केटींग)

मु. पो. इंदापूर, जि. पुणे



संपर्क क्रं. : ८७९३९७५९९९

**उद्योगाचे नांव**

- लिबर्टी पोल्ट्री फार्म, इंदापूर

**कृषि उद्योगाची माहिती**

- सन २०१९ पासून सुरुवात

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**

- महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच पोल्ट्री उद्योगाविषयी विचार करुन पदवी घेतल्यानंतर लगेच उद्योग सुरु केला
- उद्योग उभारणीसाठी नवीन शेडची उभारणी करुन १0000 पक्षांची बॅच सुरु केली. परंतु, खाद्य व लसीकरणाचे व्यवस्थापन न केल्याने अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही
- पुर्वानुभव लक्षात घेता पोल्ट्री उद्योगामधील अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती घेऊन त्यानुसार नियोजन केले
- पोल्ट्रीमधील पक्षांचे खाद्य, लसीकरण इ. अद्ययावत माहिती अवगत करुन १४000 पक्षांच्या दुसऱ्या बॅचचे पाणी व इतर सुविधांसह व्यवस्थित काळजीपूर्वक संगोपन केले
- पोल्ट्रीमध्ये योग्य व सुरक्षित खाद्य निवड करुन उद्योग यशस्वी केला
- पक्षांची योग्य व गुणवत्तापूर्ण देखभाल करुन आनंद ॲग्रो या सारख्या कंपन्यांना विक्री केली. पोल्ट्री व्यावसायिकांना योग्य बाजारपेठ असलेल्या पुणे व मुंबई त्याचबरोबर विविध घटकांच्या माध्यमातुन कर्नाटक व दिल्लीपर्यंत मार्केटींगचे नियोजन करुन विक्री केली
- पाच कुशल कामगारांच्या मदतीने सध्या वर्षातून १४ हजार पक्षांच्या पाच बॅचेस घेत आहे. भविष्यात ४३000 पक्षांची शेडची उभारणी करत आहे. त्याबरोबरच अंडी उबविणे उद्योग, पोल्ट्रीमधील खाद्यासाठीचा उद्योग व पोल्ट्रीमधील उपलब्ध कोंबड्यांचा प्रक्रिया उद्योग सुरु करणार आहे

**वार्षिक उलाढाल :** रु. १.५ कोटी

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- शेतकऱ्यांनी पोल्ट्रीच्या माध्यमातून आपले जीवनमान उंचवावे यासाठी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना पोल्ट्रीचे महत्व तसेच भारतीय व जागतिक बाजारपेठेत कोंबड्यांना (चिकन) मिळणारा उच्चदर याविषयी माहिती देऊन अनेक शेतकऱ्यांना पोल्ट्री उद्योग सुरु करण्यासाठी प्रवृत्त केले
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कमी वेळ व कमी कष्ट यांची सांगड घालत शेतीपूरक उद्योगातुन जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळवता येईल याची नियोजनबध्द माहिती उपलब्ध करुन दिली
- गावातील युवा उद्योजकांना पोल्ट्री उद्योग करण्यासाठी प्रवृत्त केले








## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

### श्री. नितीन बाजीराव वरखडे
### सौ. कल्याणी नितीन वरखडे

मु. वरखडवाडी, पो. भोगाव, ता. वाई, जि. सातारा



संपर्क क्रं.: ९८९०३७४१३६

**शिक्षण** : एच. एच. सी. (कला)

**जमीनधारणा क्षेत्र** : ४.00 हे.

**सध्या घेत असलेली पिके** : ज्वारी, गहु, हरभरा, घेवडा, कांदा, लसुन, भुईमुग, भात, सोयाबीन, ऊस, सुर्यफुल, केळी, आंबा, नारळ, मिरची, कलिंगड, हळद, कोथिंबीर

**शेती निगडीत व्यवसाय** : कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, ट्रॅक्टरचलीत मळणीयंत्र

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

- रब्बी ज्वारी (फुले रेवती) पीक स्पर्धेत राज्यात तृतिय क्रमांक
- भात (इंद्रायणी) पीक स्पर्धेत कोल्हापूर विभागात प्रथम
- उसाचे एकरी ११0 टन उत्पादन
- हरभरा व गहू पीक स्पर्धेत तालुक्यामध्ये अनुक्रमे पहिला व दुसरा क्रमांक
- ठिबक सिंचन व तुषारसिंचनाचा वापर करुन पाणी व्यवस्थापन
- बीबीएफ पेरणीयंत्र, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, पल्टी, रेजर, मळणी मशीन, सारायंत्र, कोळपणी यंत्र व फवारणी यंत्र याव्दारे शेतीमधील सर्व कामे केली जातात
- महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पी.एस.बी., रायझोबीयम, ॲझोस्पिरीलम जिवाणु खतांचा व जिवामृत व्हर्मीवॉश, गांडुळखत, ताग, धैंचा या सेंद्रिय निविष्ठांचा वापर शेतीमध्ये करत आहे

**तंत्रज्ञानाचा प्रसार**

- शेतकऱ्यांच्या शेतीशाळेत भात लागण व ज्वारी पिकाविषयी मार्गदर्शन
- आकाशवाणी केंद्र, सातारा येथे सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन काळाची गरज, बटाटा लागवड तंत्रज्ञान या विषयांवर मुलाखत
- उसाच्या को-८६0३२ या वाणाचे पायाभूत बियाणे तयार करुन त्याचा प्रसार केला
- सोयाबीन पिकात सरी वरंबा व बीबीएफ पध्दतीने पेरणी करुन भरघोस उत्पादन घेऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली
- कृषि विभागामार्फत राबवण्यात आलेल्या शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून ग्राहकांना थेट शेतमालाची विक्री

**पुरस्कार**

- उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार -२०१९ : आत्मा, सातारा
- शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार- २०१९ : सेवागीरी (पुसेगाव)
- महाराष्ट्र ऊसभूषण कार्यगौरव पुरस्कार- २०१९ : महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघ

**वार्षिक उत्पन्न :** रु. ९ ते १0 लाख










## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

जून,२०२३